**अमेरिकन विदेश मंत्रालयाकडून द रेझिस्टन्स फ्रंट (TRF) दहशतवादी संघटना घोषित (18 जुलै 2025**

18 जुलै 2025

अमेरिकन सरकारच्या विदेश मंत्रालयाने 'द रेझिटन्स फ्रंटला' (TRF) विदेशी दहशतवादी संघटना (FTO) आणि विशेष घोषित जागतिक दहशतवादी (SDGT) म्हणून घोषित केले आहे. भारत सरकारने अमेरिकन सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. आम्ही या संदर्भाने अमेरिकन परराष्ट्र मंत्री श्री. मार्को रुबियो यांच्या नेतृत्वाचे स्वागत आणि कौतुक करतो.

2. पाकिस्तान स्थित लष्कर-ए-तैय्यबा (Let) या दहशतवादी संघटनेची TRF घटक आहे. आजवर अनेक दहशतावादी कारवायांमध्ये सहभाग दिसून आला आहे. ज्यामध्ये पहलगाम (जम्मू आणि काश्मीर) येथे 22 एप्रिल 2025 रोजी नागरिकांवर झालेल्या क्रूर हल्ल्याचा समावेश होता. या हल्ल्याची दोनवेळा जबाबदारी संघटनेनं स्विकारली होती.

3. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत आणि दहशतवादाच्या पायाभूत सुविधा नष्ट करण्यासाठी जागतिक सहकार्याच्या गरजेवर भारताने सातत्याने भर दिला आहे. TRF दहशतवादी संघटना घोषित करणं हे वेळेवर आणि महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ज्यामधून दहशतवादविरोधी लढाईत भारत आणि अमेरिकेतील दृढ सहकार्याचं दर्शन घडतं.

4. भारतानं दहशतवादाच्या विरोधात झिरो टॉलरन्स (शून्य सहनशीलतेचं) धोरण स्वीकारलं आहे. दहशतावादी संघटना आणि संलग्नित गट यांना जबाबदार धरण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्यांसोबत निकटतम सहकार्याची भूमिका राहिली आहे.

नवी दिल्ली

18 जुलै 2025